Marathi

# आजीच्या घरचा कार प्रवास



लेखन- डॉ. प्रमोद कुमार तिवारी

चित्रांकन- आस्था बसुमतारी, राधिका बोंद्रे

**Stories speak...!**

Stories are the heartbeat of life, weaving together the bittersweet moments that shape our existence. They ignite our spirit, empower us to face life's challenges, and guide us through the complexities of the world. From the digital age to women's rights, from nature conservation to the pursuit of livelihood, and from embracing life's trials to exercising our right to vote – these stories illuminate the path to a meaningful life. Stories woven around 'Critical Life Skills' not only entertain but also cultivate wisdom, enhance our reasoning, and teach us the art of making informed and thoughtful decisions. Step into the narrative, reflect deeply, and let the stories lead you forward!

**Coordinator:** Prof. Usha Sharma, Professor & In-charge, Cell for National Centre for Literacy, NCERT, New Delhi

**Writer:** Dr. Pramod Kumar Tiwari

**Illustrations:** Aastha Basumtary, Radhika Bondre

**Typography:** Rahul Anil Rathod, Director, Illusion Productions, Mumbai

**Layout:** Mohd. Nazim, Designer

**Translation:** Central Institute of Indian Languages, Mysore

**Reviewer:** Central Institute of Indian Languages, Mysore

**Guidance:** Prof. Nina Sabnani, Animator and Guest Faculty, Department of Design, IIT Hyderabad

**Acknowledgements:**

Akshay Kumar Dixit, Mentor Teacher, Delhi Administration

Shyam Singh Sushil, Writer

Dr. Vibhuti Pandya, Head, Animation & Multimedia Department, BIT Jaipur

Gautam Goswami, Assistant Professor, Animation & Multimedia Department, BIT Jaipur

**IIT Hyderabad:** Dr. Prasad S. Onkar, Associate Professor and Head, Department of Design; Prof. Deepak John Matthew, Professor, Department of Design; Delwyn Jude Remedios, Assistant Professor, Department of Design; Ankita Roy, Assistant Professor, Department of Design; Dr. Mohd. Shahid, Assistant Professor, Department of Design; Dr. Saurav Deori, Assistant Professor, Department of Design; Dr. Shuhita Bhattacharjee, Assistant Professor, Department of Liberal Arts

Mohd. Shah Alam, Senior Consultant (ICT), Cell for National Centre for Literacy, NCERT

Bhawna Khera, Junior Project Fellow, Cell for National Centre for Literacy, NCERT

# आजीच्या घरचा कार प्रवास

लेखन- डॉ. प्रमोद कुमार तिवारी | चित्रांकन- आस्था बसुमतारी, राधिका बोंद्रे

राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING


आज सकाळपासूनच आकाश आणि रिंकी खूप उत्साहात होते. आज ते आजीच्या घरी जाणार होते.
आकाश नुसता वडिलांची ऑफिसमधून घरी येण्याची वाट पाहत होता.
संध्याकाळ होताच रमेश ऑफिसमधून परतले.
लवकरच आजीच्या घरी जाण्यासाठी टॅक्सी बुक केली गेली.


रिंकीने सर्व सामान तिच्या आईसोबत टॅक्सीत ठेवले.
दुसरीकडे वडिलांनी समजावल्यानंतरही आकाश जिद्दीने ड्रायव्हरच्या शेजारी बसला.
आणि टॅक्सी आजीच्या घराच्या दिशेने निघाली!


गाडी घरापासून थोड्या अंतरावर पोहोचली तेव्हा आकाश आणि ड्रायव्हर काका दोघांनीही सीट बेल्ट घातला नसल्याचे रिंकीला दिसले.
आकाश, तू तुझा सीट बेल्ट लाव.
माहित आहे माहित आहे! मी महामार्गावर पोहोचल्यावर लावीन.
काका, तुम्हीही गाडी चालवताना सीट बेल्ट लावला पाहिजे.
ड्रायव्हरने रिंकीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.


तेवढ्यात रिंकीची नजर गाडीच्या बाजूच्या आरशावर पडली.
काका, तुम्ही या तुटलेल्या काचांमधून मागून येणारी वाहने कशी बघणार?
मी अनेक वर्षांपासून गाडी चालवत आहे. मला या आरशाची गरज नाही.
बाबा, हे काका किती बेफिकीरपणे गाडी चालवत आहेत. आपण आजीच्या घरी सुखरूप पोहोचू, ना?
रिंकी काळजी करू नकोस. सर्व काही ठीक आहे.
आता गाडी हायवेवर आली होती.


आकाशने अजून सीट बेल्ट लावला नव्हता. त्याचे संपूर्ण लक्ष रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या इतर वाहनांकडे होती.
रिंकीने पुन्हा एकदा त्याला सीट बेल्ट घालायला सांगितले.
आकाशने चिडून सीट बेल्ट लावला पण तो सैल करून हाताने धरला आणि पुन्हा एकदा येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या पाहू लागला.



ड्राइवर निष्काळजीपणे गाडी चालवत होता. कधी तो फोनवर बोलायचा तर कधी चालत्या वाहनाची खिडकी उघडून रस्त्यावर पान थुंकायचा. रमेश देखील त्यांच्या बेजबाबदार वागणुकीमुळे नाराज झाले होते.







रमेशचं हे काही बोलणं पूर्ण होण्यापूर्वीच कार समोरून येणाऱ्या मोटारसायकलला धडकली.
बूम!
अपघात होताच रस्त्यावर लोकांची गर्दी झाली. गर्दीतील कोणीतरी रुग्णवाहिकाही बोलावली.



सीट बेल्ट नीट न लावल्याने आकाशलाही दुखापत झाली.
दुसरीकडे मोटारसायकलस्वारानेही चालकाकडे नुकसान भरपाईची मागणी सुरू केली.
तुमच्या निष्काळजीपणामुळे काय झाले ते पहा
माफ करा सर. माझी चूक झाली. मी लक्ष दिले नाही.
कोणताही मोठा अपघात झाला नाही आणि कोणीही गंभीर जखमी झाले नाही याचा आनंद रिंकीला होता.
तिने मनाशी ठरवले होते की ती मोठी होऊन गाडी चालवायला शिकेल तेव्हा नक्कीच वाहतुकीचे सर्व नियम पाळेल.



# वाहतुकीचे काही नियम-

1.गाडी चालवताना सीट बेल्ट किंवा हेल्मेट घाला

2. निर्धारित गती मर्यादा ओलांडू नका

3.नेहमी ट्रॅफिक सिग्नलचे पालन करा

4.आपल्या लेनमध्ये रहा

5.इतर वाहनांपासून सुरक्षित अंतर ठेवा

6.दारूच्या नशेत गाडी चालवू नका

7.वाहन चालवताना मोबाईल फोन वापरू नका

8. रुग्णवाहिका किंवा अग्निशमन यासारख्या आपत्कालीन वाहनांसाठी मोकळे मार्ग द्या

9.आपल्या वाहनाची नियमित देखभाल करा

10. मुख्य रस्ते, चौक, आणि वळणांवर वळण घेताना वेग कमी करा.



सा विद्या या विमुक्तये

**CELL FOR NATIONAL CENTRE FOR LITERACY**

**राष्ट्रीय साक्षरता केंद्र–प्रकोष्ठ**





















# Story Books

Based on Critical Life Skills










































राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद्
NATIONAL COUNCIL OF EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING

